महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : एलटीडी-३४१७/सी.आर.१४/२०१७/तीन दिनांक : ०७ मार्च, २०२२

# - : शुद्धिपत्रक :-

**विषय :- पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा- २०२१ (जाहिरात क्रमांक १०/२०२२)**
**- अर्ज सादर करण्याच्या दिनांकास मुदतवाढ देण्याबाबत -**

पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा- २०२१ करीता दिनांक ११ फेब्रुवारी, २०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये (जाहिरात क्रमांक १०/२०२२) कमाल वयोमर्यादा पूर्ण होण्यापूर्वी परीक्षेच्या सलग तीन संधी मिळाल्या नसतील अशा उमेदवारांना कमाल वयोमर्यादेनंतर अर्ज सादर करण्याची संधी देण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. सदर तरतुदीनुसार कमाल वयोमर्यादा पूर्ण होण्यापूर्वी परीक्षेच्या तीन संधी मिळाल्या नसतील केवळ अशा वयाधिक उमेदवारांकरीता ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या दिनांकास खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे :-

(१) विहित पद्धतीने अर्ज सादर करुन ऑनलाईन शुल्क भरण्याची कार्यवाही तसेच भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक १२ मार्च, २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे.

(२) चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक १४ मार्च, २०२२ पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे आवश्यक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही. तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

**२.** दिनांक ११ फेब्रुवारी, २०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीमधील इतर अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल नाही.

ठिकाण : मुंबई

सहसचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग